**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०४ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **गावखेड्यांचं रूपांतर समृद्धी आणि संधींचं प्रकाशमान केंद्र म्हणून करायला केंद्रसरकारचे प्राधान्य -पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **महारेलने राज्यात बांधलेल्या सात उड्डाणपुलांचे लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या नागपुरात होणार.**
3. **रोजगार हमीच्या कामांची मजुरी वाढवून देण्यासाठी प्रस्ताव केंद्राकडे करण्याच्या रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या सूचना.**
4. **विदर्भात थंडीचा जोर कायम, ९ अंश सेल्सियससह नागपूर ठरले सर्वात थंड.**

ग्रामीण भारत महोत्सव

गावखेड्यांचं रूपांतर समृद्धी आणि संधींचं प्रकाशमान केंद्र म्हणून करायला तसंच ग्रामीण भारताला सक्षम करायला केंद्र सरकारचं प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ग्रामीण भारत महोत्सवाचं उदघाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले की

***आज देश के ग्रामीण इलाकों में जो काम हो रहे है, उनमे गावो के सिखाये अनुभवों की भी भूमिका है । २०१४ से मै लगातार, हर पल ग्रामीण भारत की सेवा में लगा हु । गांव के लोगो को गरिमापूर्ण जीवन देना ये मेरी सरकारी की प्राथमिकता है ।***

ग्रामीण समाजाला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना तीन लाख कोटी रुपयांची मदत करण्यात आल्याचं ते म्हणाले. याशिवाय स्वच्छ भारत अभियान, पीएम आवास, जल जीवन मिशन, शुद्ध पेय जल व्यवस्था, निरामय आयुष्यासाठी आरोग्यसेवा यांसारख्या योजना सुरु असून केंद्रीय मंत्रिमंडळानं नुकतीच पीएम पीक विमा योजनेला आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे, गेल्या १० वर्षात कृषी कर्जाच्या रकमेत साडेतीन पट वाढ झाली. आता पशुपालक आणि मत्स्यपालकांनाही किसान क्रेडिट कार्ड दिले जात आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी या महोत्सवात सहभागी झालेल्या कारागिरांशी संवाद साधला. या महोत्सवाला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी उपस्थित होते.

उड्डाणपूल लोकार्पण

महारेलने राज्यात बांधलेल्या सात उड्डाणपुलांचे लोकार्पण उद्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे.रामदासपेठेतील सेंट्रल

बाजार रोडवरील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाच्या पदव्युत्तर वसतिगृहाच्या क्रीडा मैदानावर सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होईल. नागपूर जिल्ह्यातील गोधनी, वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक, चंद्रपूरमधील बाबूपेठ रेल्वे फाटक, जळगाव रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक, वाशीम रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक या ठिकाणी ७ उड्डाणपूल महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालयाचा संयुक्त उपक्रम असलेल्या महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेडने बांधले आहेत.

संतोष देशमुख

सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी आज तीन आरोपींना अटक करण्यात आली. सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या दोन फरार आरोपींना बीड पोलीस दलाच्या विशेष पथकानं आज सकाळी पुण्यात अटक केली. या दोघांना पुढील तपासासाठी सी आय डी च्या ताब्यात देण्यात येणार आहे, असं पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी सांगितलं. या दोन आरोपींना आज केज इथल्या न्यायालयात हजर करण्यात आलं.हत्या प्रकरणात सहभाग असल्याच्या आरोपावरून सिद्धार्थ सोनावणे या आणखी एका संशयिताला विशेष शोध पथकानं मुंबईत अटक केली.

एस.टी.महामंडळ

एस. टी महामंडळ नफ्यात राहण्यासाठी महामंडळाने बृहत कृती आराखडा तयार करावा. यासाठी परिवहन क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, वाहतूकदार यांच्या सूचना व अभिप्रायांचा अभ्यास करावा, अशा सूचना परिवहन, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आढावा बैठकीत दिल्या आहेत. राज्यातील बस स्थानकांवर प्रवाशांना दर्जेदार सुविधा देऊन स्वच्छतेची कोटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. महिला प्रवाशांसाठी प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

माणिकराव कोकाटे

शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक इथं बातमीदारांशी बोलत होते. नव्या कायद्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी पोलिसांनी करायच्या कारवाईबाबत पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा, असं कोकाटे यांनी म्हटलं आहे.

भरत गोगावले

रोजगार हमीच्या कामांची मजुरी वाढवून देण्यासाठी प्रस्ताव केंद्राकडे सादर करावा, अशा सूचना रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरत

गोगावले यांनी दिल्या आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.अनेक जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढलेले आहेत तसंच ग्रामीण भागात उद्योग उभारणी मोठ्या प्रमाणावर होत असून उद्योग क्षेत्रातील मजुरीचे दर जास्त आहेत. या बाबींचा विचार होऊन मजुरीचे दर ठरवावेत, अशा सूचनाही मंत्री गोगावले यांनी यावेळी दिल्या.

तालुकास्तरीय बाल क्रीडा

यवतमाळच्या राळेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वनोजा इथं आयोजित तालुकास्तरीय बाल क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आज राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्या हस्ते झालं. बाल खेळाडूंनी स्पर्धेत खेळाचे उत्तम प्रदर्शन करावे, असे ते यावेळी म्हणाले. खेळ स्पर्धा मुलांच्या सुप्त गुणांना व्यक्त करण्यासाठी संधी देते. त्यामुळे मुलांनी पुर्ण मन लावून आपला खेळ दाखवला पाहिजे. कोणतीही स्पर्धा कमी नाही. अशाच स्पर्धेतून भविष्यात मोठे खेळाडू घडत असतात, असे यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना उईके बोलत होते.

स्वच्छ माझे अंगण

शासनाच्या पाणीपुरवठा आणि  स्वच्छता विभागाच्या वतीने १ जानेवारी ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत 'स्वच्छ माझे अंगण' अभियान राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातही या अभियानाला सुरुवात झाली असून जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायतींनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी बी वैष्णवी यांनी केले आहे.‘स्वच्छ भारत मिशन- टप्पा दोन’ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, कुटुंब स्तरावर या बाबींची प्रभावीपणे अमलबजावणी होऊन स्वच्छतेच्या बाबतीत सवय अंगीकृत करण्यासाठी कुटुंबांना प्रोत्साहन देणे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

कसोटी क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या, सिडनी इथं सुरू असलेल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात, भारतानं दुसऱ्या दिवसअखेर आपल्या दुसऱ्या डावात ६ बाद १४१ धावा केल्या आहेत. आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १८१ धावांत गुंडाळला आणि पहिल्या डावात ४ धावांची माफक आघाडी मिळवली. त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताचा डाव पुन्हा एकदा गडगडला. मात्र ऋषभ पंत यानं ३३ चेंडूत ६६ धावा करत भारताच्या धावसंख्येत मोठी भर घातली. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा रविंद्र जडेजा ८ धावांवर तर वॉशिंग्टन सुंदर ६ धावा करून खेळपट्टीवर टिकून होते. दरम्यान, या सामन्यासाठी कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत असलेला जसप्रित बुमराह याला

सामना सोडून वैद्यकीय तपासणीसाठी जावं लागल्यानं, त्याच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

हवामान

विदर्भात थंडीचा जोर कायम असून आज नागपुरात सर्वात कमी किमान तापमान 9 अंश सेल्सिअस इतकी नोंद करण्यात आली. नागपूर पाठोपाठ गोंदिया येथे ९ पूर्णांक पाच इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. तर गडचिरोली येथे १० पूर्णांक सहा इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. याशिवाय वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान ११ ते १२ अंश सेल्सिअस दरम्यान असून, बुलढाणा आणि वाशिम येथे अनुक्रमे १३ आणि १५ अंश सेल्सिअस इतक्या तापमान नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, अकोला येथे ३३ पूर्णांक दोन इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. आगामी काही दिवस हवामान कोरड राहणार असल्याचा अंदाज नागपूर हवामान विभागाने वर्तवला आहे.

आशिष जयस्वाल

शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे आज गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांचे गोंदियात आगमन होतात शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश शिव्हरे आणि शिवसैनिकांनी भव्य बाईक रॅली काढत त्यांचे स्वागत केले. आपल्यावर ज्या ज्या विभागांची जबाबदारी दिली आहे ते योग्यपणे पार पाडणे हे आपले प्राथमिक कर्तव्य असल्याचे सांगत, कोणत्या एका जिल्याचा पालकमंत्री होणे हे आपले ध्येय नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

*****